**<u>ठळक बातम्या</u>**

आत्मनिर्भरता आणि **वोकल फॉर लोकल** हा मंत्र घेऊन देशानं पुढे जायला हवं, असं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीत प्रधानमंत्र्यांच्या विविध देशांच्या राष्ट्रप्रमुखांशी भेटीगाठी

मराठा आरक्षणासाठीचं उपोषण आंदोलन उद्यापासून तीव्र करण्याचा मनोज जरांगे यांचा इशारा

यंदाचा रॅमन मॅगसेसे पुरस्कार ‘फाउंडेशन टू एज्युकेट गर्ल्स ग्लोबली’ या स्वयंसेवी संस्थेला जाहीर

**आणि**

आशिया चषक पुरुष हॉकी स्पर्धेत भारताची जपानवर ३-२ नं मात

**<><><><>**

आत्मनिर्भरता आणि वोकल फॉर लोकल हा मंत्र घेऊन देशानं पुढे जायला हवं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मन की बात या कार्यक्रमाच्या १२५ व्या भागात केलं. सणासुदीत स्वदेशी वस्तूंना प्राधान्य द्यावं आणि स्वच्छता पाळावी, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. यूपीएससी परीक्षेत अपयशी ठरलेल्या विद्यार्थ्यांसाठी ‘प्रतिभासेतू’ हे डिजिटल व्यासपीठ तयार झाल्याचं त्यांनी सांगितलं. जम्मू-काश्मीरमधल्या खेलो इंडिया जलक्रीडा महोत्सवातल्या विजेत्यांचं अभिनंदन करताना खेळ देशाच्या एकात्मतेसाठी महत्त्वाचे असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. सौरऊर्जेमुळं शेतकऱ्यांचं जीवनमान बदलत असल्याचा उल्लेख त्यांनी केला. अभियंता विश्वेश्वरैय्या जयंती, विश्वकर्मा जयंती आणि हैदराबाद मुक्तीसंग्राम दिनाच्या शुभेच्छा देतानाच निजामाच्या अत्याचाराविरोधात लढलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचं त्यांनी स्मरण केलं. शहीद जवानांची माहिती जतन करणारे जितेंद्रसिंह राठौड यांचाही त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. मागच्या काही दिवसात देशभरात **अतिवृष्टी** आणि इतर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या जीवितहानी आणि वित्तहानीबद्दल प्रधानमंत्र्यांनी

दुःख व्यक्त केलं. तसंच या काळात एनडीआरएफ, एसडीआरएफ, डॉक्टर आणि मदत करणाऱ्या सर्व नागरिकांचं कौतुक केलं.

**- -होल्ड बाईट डिजास्टर - -**

**भारतीय संस्कृती**चा प्रभाव परदेशातल्या छोट्या छोट्या शहरातही दिसून येतो असं प्रधानमंत्री म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यानीं महर्षी वाल्मिकी यांच्या मूर्तीची स्थापना करणाऱ्या इटलीमधल्या कँपरोतोंदो या शहराचं उदाहरण दिलं. कॅनडात मिसीसागा इथल्या प्रभू श्रीरामाच्या ५१ फुटी मूर्तीचा उल्लेखही त्यांनी केला. तसंच रशियामधल्या व्लादिवोस्तोक इथं शाळकरी मुलांनी रामायणातल्या कथांवर आधारित चित्रांचं प्रदर्शन भरवल्याचं सांगत भारतीय संस्कृतीचा प्रसार जगाच्या कानाकोपऱ्यात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा केली. चीनमधे तियानजिन इथं झालेल्या बैठकीत केलेल्या चर्चेची ध्वनिफीत प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. गेल्या वर्षी कजान इथं जिनपिंग यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनंतर भारत- चीन संबंधांना सकारात्मक दिशा मिळाल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

तियेनजिन इथं शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांच्या प्रतिनिधींचं स्वागत करण्यासाठी आयोजित समारंभाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपस्थित राहिले. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग आणि त्यांच्या पत्नी पेंग लियुआन यांनी मोदी यांचं स्वागत केलं. या समारंभाच्या वेळी इतर अनेक राष्ट्रांच्या प्रमुखांशी तसंच प्रतिनिधींशी प्रधानमंत्री मोदी यांची भेट झाली. नेपाळचे प्रधानमंत्री केपी शर्मा ओली, कझाकस्तानचे अध्यक्ष तोकायेव्ह आणि मालदीव्जचे प्रधानमंत्री मोहम्मद मोईज्जू यांचा त्यात समावेश होता. म्यानमाच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि शांति आयोगाचे अध्यक्ष वरिष्ठ जनरल मिन आँग हलियांग यांच्याशीही मोदी यांची भेट झाली. भारत-म्यानमा दरम्यान विविध क्षेत्रात सहकार्याविषयी त्यांच्यात चर्चा झाली.

**<><><><>**

भारत आणि चीन यांच्यातले स्थिर आणि सौहार्दपूर्ण संबंध हे या दोन्ही देशांमध्ये राहणाऱ्या २८० कोटी नागरिकांच्या हिताचे आहेत, यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि

चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांचं एकमत झाल्याची ग्वाही परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्त्री यांनी आज दिली. प्रधानमंत्र्यांच्या चीन दौऱ्याच्या निमित्ताने आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. सध्या भारत आणि चीन या दोन्ही देशांचं लक्ष सध्या स्थानिक विकासावर केंद्रित असून यात ते शत्रू नाही, तर भागीदार आहेत, यावरही दोन्ही नेत्यांची सहमती झाल्याचं त्यांनी सांगितलं. चीन-भारत सीमाप्रश्नावरही या बैठकीत चर्चा झाली. गेल्या वर्षी दोन्ही देशांनी या भागातून आपापलं सैन्य मागे घेतलं होतं आणि तेव्हापासून सीमावर्ती भागात शांतता आहे, ही बाब मोदी आणि जिनपिंग यांनी अधोरेखित केली. यापुढेही ही शांतता कायम राखण्याची गरजही त्यांनी बोलून दाखवली.

<><><><>

देशाच्या विविध भागात पावसाशी संबंधित घटनांमुळे झालेल्या नुकसानीचं सर्वेक्षण करण्यासाठी गृहमंत्रालयानं आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथकं स्थापन केली आहेत. ही पथकं येत्या आठवड्यात हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब आणि जम्मू काश्मीरमध्ये अतिमुसळधार पाऊस, अचानक आलेले पूर, दरडी कोसळणं आणि ढगफुटीचा फटका बसलेल्या भागांना भेट देतील.

<><><><>

राज्य सरकारनं अद्याप मागण्या मान्य न केल्यानं उद्यापासून उपोषण तीव्र करण्याची घोषणा  मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज केली. उद्यापासून पाणीदेखील पिणार नसल्याचं त्यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर वार्ताहरांना सांगितलं. ओबीसी प्रवर्गात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानात जरांगे यांनी सुरु केलेल्या उपोषणाचा आजचा तिसरा दिवस आहे. डॉक्टरांच्या पथकाने आज त्यांची प्रकृती तपासली आणि त्यांच्या रक्तदाब आणि मधुमेह चाचण्या सुरळीत असल्याचा निर्वाळा दिला.

मराठा आणि कुणबी हे एकच आहेत याला ५८ लोख कुणबी नोंदीचा आधार आहे, ज्यांच्या कुणबी नोंदी आढळल्या नाहीत त्यांची पोटजात म्हणून कुणबी नोंद करावी, असं जरांगे म्हणाले. हैदराबाद गॅझिटियरनुसार मराठवाड्यातला मराठा हा कुणबी आहे, याचा पुनरूच्चार त्यांनी केला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी आज मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आणि त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.

**<><><>**

हैदराबाद गॅझेटियरची अंमलबजावणी कशी करता येईल, यावर आजच्या बैठकीत चर्चा झाली असून यातल्या कायदेशीर बाबींबद्दल मराठा आरक्षणविषयक समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती संदीप शिंदे आणि महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ समितीला सूचना देतील, अशी माहिती मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना दिली. त्यासाठी या दोन्ही कायदेतज्ज्ञांनी वेळ मागितल्याचं ते म्हणाले. हैदराबाद गॅझेटियरबाबत मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीबाबत सरकार सकारात्मकच आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. जरांगे यांच्या बाजूच्या कायदेतज्ज्ञांशी याबाबत चर्चा करायची सरकारची तयारी असून त्यांची महाधिवक्त्यांशी भेट घालून देऊ, त्यांच्याकडचे मार्ग तपासून बघू, असंही विखे पाटील म्हणाले. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, हीच सरकारची भूमिका असून सध्या फक्त जरांगे यांच्या मागण्यांवर विचार करत आहोत, असं ते म्हणाले.

**<><><>**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे हे मराठा आरक्षणाच्या नावाखाली राजकीय लाभ मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. जरांगेंनी यापूर्वी आंदोलन केल्यानंतर मराठा समाजाला सामाजिक तसंच आर्थिकदृष्ट्या मागास श्रेणीचं आरक्षण देण्यात आलं, मात्र त्यात राजकीय आरक्षण समाविष्ट नसल्यानं जरांगे आंदोलन करत आहेत असं पाटील यांनी म्हटलं आहे.

**<><><>**

आशियाचा नोबेल म्हणून ओळखला जाणारा रॅमन मॅगसेसे पुरस्कार यंदा 'फाउंडेशन टू एज्युकेट गर्ल्स ग्लोबली' या स्वयंसेवी संस्थेला जाहीर झाला आहे. रॅमन मॅगसेसे फाऊंडेशननं आज यावर्षीच्या विजेत्यांची घोषणा केली. ग्रामीण आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास भागांमध्ये स्थानिक आणि सरकारी सहभागातून मुलींच्या शिक्षणाला चालना द्यायचं काम

'एज्युकेट गर्ल्स' संस्था करते. सफीना हुसैन यांनी २००७मध्ये या संस्थेची स्थापना केली होती. मॅगसेसे पुरस्कार मिळवणारी ही भारतातली पहिली संस्था आहे. याबरोबरच मालदीवच्या पर्यावरणवादी कार्यकर्त्या शाहीना अली आणि फिलिपीन्सचे फ्लाव्हियानो अँटोनियो एल. व्हिलान्यूएव्हा यांनाही यंदा मॅगसेसे पुरस्कारानं गौरवलं जाणार आहे. पदक, सन्मानचिन्ह आणि रोख असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. ७ नोव्हेंबर रोजी पुरस्कार वितरण सोहळा होईल.

**<><><><>**

आशिया चषक पुरुष हॉकी स्पर्धेच्या आजच्या सामन्यामध्ये भारतानं जपानवर ३-२ अशी मात केली. बिहारमध्ये राजगीर इथं झालेल्या या चुरशीच्या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग याने दोन गोल केले तर मनदीपने एक गोल केला. जपानचे दोन्ही गोल कोसेई कावाबेने केले.  या स्पर्धेचा अ गटातला हा सामना जिंकून भारताने  सुपर-४ मध्ये प्रवेश केला आहे. स्पर्धेतल्या विजयी संघाला २०२६च्या आशिया चषक स्पर्धेत आपले  स्थान कायम करता येणार आहे.

जपानवर सलग दुसरा विजय मिळवून भारतानं आपली कामगिरी सुधारल्याचं कर्णधार हरमनप्रीत सिंगनं सांगितलं. सामन्यानंतर माध्यमांशी बोलताना ही लढत चुरशीची ठरल्याचं आणि जपाननं जोरदार पुनरागमनाचा प्रयत्न केल्याचं त्यांनं नमूद केलं.

**//<><><><>//**